## ७.अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती (भारत सरकार शिष्यवृत्ती) योजना

| अ.क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| ०१ | अंमलबजावणी यंत्रणा | अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्ती (भारत सरकार शिष्यवृत्ती) योजना |
| ०२ | कायदे / नियम / शासन निर्णय | आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. शिष्यवृत्ती-२०२१/प्रक्र९०/का-१२ दि.१७ जानेवारी २०२२ |
| ०३ | थोडक्यात कार्यपध्दती व लाभ | आदिवासी विद्यार्थ्यांना शालांत परिक्षोत्तर उच्च शिक्षणाकरिता प्रोत्साहित करण्याच्या दृष्टिने व त्यांना उच्च शिक्षणाचा खर्च भागविता यावा म्हणून भारत सरकारद्वारा ही योजना राबविली जाते.<br>१. वैद्यकीय व अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील निवासी विद्यार्थ्यांना रु. १२००/- व अनिवासीसाठी रु. ५५०/- मासिक निर्वाह भत्ता<br>२. तांत्रिक, आयुर्वेदिक, होमिओपॅथिक इ.शास्त्र अभ्यासक्रमातील निवासी विद्यार्थ्यांसाठी रु.८२०/- दरमहा व अनिवासी विद्यार्थ्यांसाठी रु.५३०/- दरमहा मासिक निर्वाह भत्ता<br>३. पदवीचे सामान्य अभ्यासक्रम, अभियांत्रिकी पदविका प्रमाणपत्र वास्तुकला इ. साठी निवासी रु. ५७०/- अनिवासीसाठी रु. ३००/- मासिक निर्वाह भत्ता<br>४. इ.११ वी व १२ वीसाठी व पदवीचे पहिल्या वर्षातील निवासी विद्यार्थ्यांसाठी दरमहा रु.३८०/- व अनिवासीसाठी रु.२३०/- मासिक निर्वाहभत्ता देण्यात येतो.<br>५. वरील अभ्यासक्रमांचे अनुज्ञेय शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क संबंधित महाविद्यालयास अदा केले जाते. |
| ०४ | पात्रता/निकष | • विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा.<br>• पालकांचे वार्षिक उत्पन्न मर्यादा रुपये २.५० लाख.<br>• विद्यार्थी पूर्णवेळ नोकरीत नसावा.<br>• एकाच कुटूंबातील सर्वांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील. |
| ०५ | अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना | ऑनलाईन अर्ज नमुना https://mahadbt.maharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |
| ०६ | अर्जाची किंमत असल्यास किती ? | अर्ज विनामूल्य उपलब्ध आहे. |
| ०७ | जोडावयाची कागदपत्रे | प्रत्यक्ष योजनेचा लाभ देतेवेळी जातीचा दाखला, उत्पन्न दाखला, रहिवासी दाखला, प्रवेश पावती व अनुषंगिक कागदपत्रे |